# वार्तापत्र

मुंबई वाहतूक नियंत्रण शाखेस ई-बाईकस् चालक विशेषत: डिलेव्हरी बॉईज वाहतूकीच्या नियमांचा भंग करीत असल्याच्या मोठया प्रमाणात तक्रारी नागरिकांकडून प्राप्त होत आहेत. असे ई-बाईकस् चालक वाहतूक नियमांचा भंग करून स्वत:च्या तसेच इतरांच्या जिवीतास धोका निर्माण करित आहेत. त्या अनुषंगाने बेशिस्त ई-बाईक चालकांना प्रतिबंध करण्यासाठी व त्यांना वाहतूकीची शिस्त लागावी म्हणून दिनांक ०९/०८/२०२४ ते दिनांक ११/०८/२०२४ रोजी पर्यंत ‘विशेष मोहिम’ आयोजन करण्यात आली होती.

विशेष मोहिमेदरम्यान वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २२१ ई-बाईक चालकांवर भा.न्या.सं. अन्वये गुन्हे दाखल करून एकुण २९० ई-बाईकस् जप्त करण्यात आल्या आहेत. तसेच विरूध्द दिशेने ई-बाईक चालविणे -२७२, सिग्नल जम्पींग-४९१, नो एन्ट्र-२५२ व स्थानिक गुन्हे (LAC)-१६१ अशा एकुण ११७६ ई-बाईकवर कारवाया करून एकुण रू.१,६३,४००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे.

तरी नागरिकांनी अशाप्रकारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे ई-बाईकस् चालक व डिलेव्हरी बॉईज् आढळून आल्यास मुंबई वाहतूक नियंत्रण शाखेच्या हेल्पलाईनवर तक्रार करावी.